| | |
|---|---|
| MHNS170010122025 | **चंपाबाई पंचीलाल नवले**<br>**विरुध्द**<br>**कोणीही नाही** |

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४४/२०२५

## (जाहिर दि. १० मार्च, २०२६)

**१.** अर्जदार क्र. १ ते ७ यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदारांची थोडक्यात हकीकत अशी की, मयत पंचीलाल किसन नवले यांच्या अर्जदार क्र.१ या पत्नी असुन अर्जदार क्र.३,४ व ५ हया मयताच्या मुली आहेत तसेच अर्जदार क्र.२,६ व७ ही मयताची मुले आहेत. कै. पंचीलाल किसन नवले हे दि.१६/०५/२०२२ रोजी मयत झाले. त्यांना अर्जदारांशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. कै. पंचीलाल किसन नवले यांनी हयात असताना घरकुल मिळणेकामी मौजे चिंचविहिर ता. नांदगाव येथील ग्रामपंचायतीमध्ये अर्ज केला होता. त्यानुसार त्यांचे नावे घरकुल मंजूर झालेल्या यादीत आले आहे. परंतु, ते मयत झाले असल्याने व त्यांचे नावे मंजूर असलेल्या घरकुलाच्या पुढील कार्यालयीन कामकाजासाठी अर्जदार हे ग्रामपंचायत कार्यालय मौजे चिंचविहिर नांदगाव यांचेकडे गेले असता त्यांनी वारसांचे नाव लावणेकामी व इतर शासकीय कामासाठी न्यायालयातून वारस दाखला आणणेस तोंडी सांगितले. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

**३.** निशाणी ९/१ प्रमाणे दि. १७/०१/२०२६ रोजीच्या दैनिक गावकरी या वृत्तपत्रामध्ये जाहिर नोटीस प्रसिध्द करुन आक्षेप मागविण्यात आला होता. विहीत कालावधीमध्ये सामनेवालेतर्फे कोणीही आक्षेप नोंदविला नाही.

**४.** निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्षसह खालीलप्रमाणे

नोंदविण्यात येत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जात मागणी केल्याप्रमाणे अर्जदार वारस दाखल मिळणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी.. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**५.** अर्जातील कथनांची पुष्टी करण्यासाठी अर्जदार क्र.६ राजु पंचीलाल नवले यांनी पुराव्याचे शपथपत्र निशाणी १० वर दाखल केले आहे. अर्जदाराने प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे.

**६.** अर्जदारांनी पुराव्याकामी अभिलेखावर खालीलप्रमाणे दस्तऐवज दाखल केले आहेत.

| | दस्ताचे वर्णन | निशाणी |
|---|---|---|
| १. | अर्जदारांच्या आधारकार्डची साक्षांकित प्रत | ३ चे यादी सोबत |
| २. | कै. पंचीलाल किसन नवले यांचे मृत्यु प्रमाणपत्र | ३ चे यादी सोबत |
| ३. | कै. पंचीलाल किसन नवले यांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल मंजूर झालेबाबतचा व वारस दाखला घेवुन येणेबाबतचा ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत चिंचविहिर यांचा दाखला. | ३ चे यादी सोबत |

### मुद्दा क्र.१ साठी

**७.** अर्जदार क्र.६ राजु यांनी अभिलेखावर पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन अर्जातील कथनांची पुष्टी केलेली आहे. अर्जदाराच्या शपथेवरील कथनांना कोणीही आव्हान दिलेले नाही. आजपावेतो कोणीही आक्षेप नोंदविलेला नसल्यामुळे अर्जदाराने दाखल केलेला तोंडी व लेखी पुरावा विना आव्हानित राहिलेला आहे.

त्यामुळे अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेल्या नमूद कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार यांचे व्यतिरिक्त कै. पंचीलाल किसन नवले यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत.

८. अर्जदाराने अर्जातील कथनांच्या पृष्टयर्थ त्याचे शपथपत्र दाखल करुन संयुक्तिक असा कागदोपत्री पुरावा सादर केलेला आहे. या अनुषंगाने मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, अर्जदार हेच कै. पंचीलाल किसन नवले यांचे कायदेशीर वारस आहेत. करीता, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार क्र. १ ते ७ हे कै. पंचीलाल किसन नवले यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र त्यांना देण्यात यावे. |
| ३. | अर्जदाराने आवश्यक ते न्यायालयीन मुद्रांक शुल्क जमा करावे. |

JAGDISH MADHAV AGNIHOTRI

Digitally signed by JAGDISH MADHAV AGNIHOTRI
Date: 2026.03.10 15:43:39 +0530

(जे. एम. अग्निहोत्री)

नांदगांव. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदगांव.

दि. १०/०३/२०२६ ता.नांदगांव, जि.नाशिक.

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app "**eCourts Services**" from Android or iOS